MAHARASHTRA EDUCATION SOCIETY'S

# MES NIGHT COLLEGE OF ARTS AND COMMERCE

Affiliated by Savitribai Phule Pune University, Pune (ID: PU/PN/AC/446/2012)
Karve Road Pune 411004, Maharashtra, India | Ph.: 020-241038268
e-mail: nightcollege@mespune.in, principal.nc@mespune.in | www.http://nigtcollege.mespune.in

Dr. Sujata Adamuthe (M.Phil, SET, Ph.D)
Principal

१७/१२/२०२५

## महत्वाची सूचना

**संदर्भ :- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिपत्रक क्र. ३१६/२०२५**

सर्व विद्यार्थांना कळविण्यात येते की सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून विद्यार्थांसाठी विविध अर्थसहाय्य योजना शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चे परिपत्रक प्राप्त झालेले आहे. त्यानुसार पात्र विद्यार्थांनी सोबत जोडलेल्या परिपत्रकाचे अवलोकन करून अर्ज करावयाचा आहे.

Night College of Arts & Commerce Pune-04. M.E.S.

17.12.25
**Principal**
**M.E.S. Night College of Arts & Commerce**
**Karve Road, Pune-411 004.**

**सोबत :- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे परिपत्रक**

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे – ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## परिपत्रक क्र.३१६/२०२५

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित अस्वायत्त महाविद्यालये/विद्यापीठ विभागातील (अव्यावसायिक) अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांसाठी विविध अर्थसहाय्य योजना शैक्षणिक वर्ष २०२५–२६**

१. "क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले अर्थसहाय्य योजना"

२. "लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अर्थसहाय्य योजना"

३. "राजर्षी छत्रपती शाहू महाराज अर्थसहाय्य योजना"

४. "महात्मा जोतीराव फुले अर्थसहाय्य योजना"

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित स्वायत्त/अस्वायत्त महाविद्यालये/विद्यापीठ विभागातील (व्यावसायिक/अव्यावसायिक) अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांसाठी विविध अर्थसहाय्य योजना शैक्षणिक वर्ष २०२५–२६**

५. "स्वामी विवेकानंद अर्थसहाय्य योजना (पूरग्रस्त, दुष्काळग्रस्त व आपत्तीग्रस्त भागातील विद्यार्थ्यांसाठी)"

६. "छत्रपती शिवाजी महाराज अर्थसहाय्य योजना"

विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था/विद्यापीठ विभागात पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिक दुर्बल घटक, गुणवत्ताधारक, मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठामार्फत उपरोक्त अर्थसहाय्य योजना सुरू केलेल्या आहेत. सदर योजनांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५–२६ या वर्षात प्रवेशित विद्यार्थी/विद्यार्थिनी यांच्याकडून संबंधित महाविद्यालय/विद्यापीठ विभाग यांच्यामार्फत ऑनलाईन **(Online)** पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

- <u>"क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले अर्थसहाय्य योजना"</u>

शैक्षणिक गुणवत्ता असून देखील विद्यार्थिनी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून विद्यापीठाकडून सदर अर्थसहाय्य योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. सदर योजनेअंतर्गत सोबत जोडलेल्या नियम व अटीनुसार विद्यापीठाशी संलग्न अस्वायत्त महाविद्यालयातील/विद्यापीठ विभाग अव्यवसायिक पदवी अभ्यासक्रमाच्या जास्तीत जास्त २००० विद्यार्थिनींना गुणवत्तेनुसार व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या जास्तीत जास्त ५०० विद्यार्थिनींना गुणवत्तेनुसार प्रत्येकी रू. ५०००/– अर्थसहाय्य देण्यात येईल. (सोबत सविस्तर नियम व अटी)

M.E.S. Night College of Arts & Commerce, Pune-04.

- **"लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अर्थसहाय्य योजना"**

आर्थिक दुर्बल घटकातील गुणवत्ताधारक गरजू विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाकडून ही अर्थसहाय्य योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. सदर योजनेअंतर्गत सोबत जोडलेल्या नियम व अटीनुसार विद्यापीठाशी संलग्न अस्वायत्त महाविद्यालयातील अव्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाच्या गुणवत्तेनुसार जास्तीत जास्त २००० व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या जास्तीत जास्त ५०० विद्यार्थ्यास गुणवत्तेनुसार प्रत्येकी रू. ५,०००/– अर्थसहाय्य देण्यात येईल. (सोबत सविस्तर नियम व अटी)

- **"राजर्षी छत्रपती शाहू महाराज अर्थसहाय्य योजना"**

मागासवर्गीय घटकातील गुणवत्ताधारक गरजू विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठामार्फत सदर अर्थसहाय्य योजना कार्यान्वित केलेली आहे. **सदर योजना फक्त मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी लागू असून** पदवी व पदव्युत्तर अव्यवसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज (सर्व संलग्नित अस्वायत्त महाविद्यालये व विद्यापीठ विभागातील एकत्रित) गुणवत्तेनुसार विचारात घेतले जातील. त्यापैकी ४८ टक्के मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा एकत्रित गुणवत्तेनुसार व उर्वरित ५२ टक्के विद्यार्थ्यांचा त्या त्या प्रवर्गासाठी लागू असलेल्या आरक्षणाच्या टक्केवारीनुसार गुणानुक्रमे अर्ज विचारात घेतले जातील. पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमातील योजनेस पात्र विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे अर्थसहाय्य योजना लागू राहील. (सोबत सविस्तर नियम व अटी)

| | पदवी अभ्यासक्रम | | पदव्युत्तर अभ्यासक्रम | |
|---|---|---|---|---|
| | अर्थसहाय्य रक्कम (रूपये) | विद्यार्थी संख्या | अर्थसहाय्य रक्कम (रूपये) | विद्यार्थी संख्या |
| कला | ६००० | ६०० | ८००० | ३०० |
| वाणिज्य | ६००० | ६०० | ८००० | ३०० |
| विज्ञान | १०००० | ६०० | १६००० | ३०० |

- **"महात्मा जोतीराव फुले अर्थसहाय्य योजना"**

गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विद्यापीठामार्फत सदर अर्थसहाय्य योजना सुरू करण्यात आलेली आहे. पदवी व पदव्युत्तर अव्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज (सर्व संलग्नित अस्वायत्त महाविद्यालये व विद्यापीठ विभागातील एकत्रित) गुणवत्तेनुसार विचारात घेतले जातील. पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमातील योजनेस पात्र विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे अर्थसहाय्य योजना लागू राहील. (सोबत सविस्तर नियम व अटी)

| | पदवी अभ्यासक्रम | | पदव्युत्तर अभ्यासक्रम | |
|---|---|---|---|---|
| | अर्थसहाय्य रक्कम (रूपये) | विद्यार्थी संख्या | अर्थसहाय्य रक्कम (रूपये) | विद्यार्थी संख्या |
| कला | ६००० | ६०० | ८००० | ३०० |
| वाणिज्य | ६००० | ६०० | ८००० | ३०० |
| विज्ञान | १०००० | ६०० | १६००० | ३०० |

M.E.S. Night College of Arts & Commerce Pune-04.

- **"स्वामी विवेकानंद अर्थसहाय्य योजना** (पूरग्रस्त, दुष्काळग्रस्त व आपत्तीग्रस्त भागातील विद्यार्थ्यांसाठी)"

विद्यार्थ्यांना कोणत्या न कोणत्या कारणाने नैसर्गिक आपत्तीमुळे आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते. अशावेळी बरेच विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहतात. विद्यार्थ्यांना आर्थिक मदत होईल या उद्देशाने शैक्षणिक वर्ष २०२०–२१ पासून नव्याने सदर योजना सुरू करण्यात आलेली आहे. **सदर योजनेचा लाभ विद्यापीठाशी संलग्न सर्व व्यावसायिक व अव्यावसायिक महाविद्यालयात** प्रवेशित सरसकट पुरग्रस्त, दुष्काळग्रस्त व आपत्तीग्रस्त भागातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या एकूण ११,००० विद्यार्थ्यांस गुणवत्तेनुसार प्रत्येकी रू. २,०००/– अर्थसहाय्य देण्यात येईल. (सोबत सविस्तर नियम व अटी)

- **" छत्रपती शिवाजी महाराज अर्थसहाय्य योजना"**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्यभिषेकाच्या ३५० व्या वर्षानिमित्त विद्यापीठ संलग्नित स्वायत्त/अस्वायत्त महाविद्यालये/विद्यापीठ विभागातील पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक/अव्यावसायिक नियमित अभ्यासक्रमांस अंतिम वर्षाच्या उन्हाळी सत्राच्या संबंधित अभ्यासक्रमाच्या अंतिम परीक्षेत सर्व विद्याशाखामधून सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या (College/Institute Topper) फक्त एका विद्यार्थ्यास रू. ५०००/– अर्थसहाय्य देण्यात येईल.

## अर्ज करण्याची पद्धत :

- वर उल्लेख केलेल्या अर्थसहाय्य योजनांकरीता विहित नियम व अटी विचारात घेऊन पात्र विद्यार्थ्यांनी ऑनलाईन (Online) पध्दतीने http://bcud.unipune.ac.in/Scholorships/Applicant/Login.aspx या संकेतस्थळावर अर्ज करणे आवश्यक असून आवश्यक ती कागदपत्रे अर्जासोबत **Upload** करावीत. सोबत अर्ज करण्याची माहितीपुस्तिका जोडली आहे.
- विहित केलेल्या नियमानुसार वरील पैकी १ ते ४ पैकी एकाच अर्थसहाय्य योजनेचा लाभ मिळणार असल्यामुळे एकापेक्षा जास्त अर्थसहाय्य योजनेसाठी अर्ज करावयाचा असल्यास एकाचवेळी अर्जातील योग्य ते पर्याय निवडता येतील.
- विद्यार्थ्यांनी ऑनलाईन **(Online)** पध्दतीने सादर केलेल्या अर्जातील माहिती संबधित महाविद्यालय/विद्यापीठ विभाग यांनी काटेकोरपणे छाननी करून ऑनलाईन **(Online)** पध्दतीने विद्यापीठास विहित मुदतीत सादर करावी.

उपरोक्त अर्थसहाय्य योजनांसाठी अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक:

- वरील अर्थसहाय्य योजनांसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी **दि. १०/०१/२०२६** पर्यंत ऑनलाईन **(Online)** पध्दतीने अर्ज करावा.
- महाविद्यालय/विद्यापीठ विभागाने, विद्यार्थ्यांनी ऑनलाईन **(Online)** पध्दतीने भरलेल्या अर्जांची छाननी करून आपल्या महाविद्यालयाच्या **PUNCODE** वरून **दि. १५/०१/२०२६** पर्यंत Online पद्धतीने विद्यापीठास सादर करावी.
- **विद्यापीठ विभाग/महाविद्यालयाकडून विद्यार्थ्यांचे अर्ज (Hard Copy) स्वीकारले जाणार नाहीत.**
- महाविद्यालय/विद्यापीठ विभाग यांनी विद्यार्थ्यांनी भरलेले अर्ज तपासून अंतिम मुदतीची वाट न पाहता त्वरित ऑनलाईन पध्दतीने विद्यापीठाकडे सादर करण्याची प्रक्रिया करावी.
- बँकांचे विलनीकरण झाल्यामुळे ज्या बँकांची खाती नव्या बँकेत विलीन झालेली आहेत अशा विद्यार्थ्यांची अर्थसहाय्याची रक्कम जमा करण्यास अडचणी येतात. सबब विद्यार्थ्यांनी या संदर्भात सध्या सुरु असलेले खाते (Existing Account) वा नव्याने असणारे खाते क्र.

M.E.S. Night College of Arts & Commerce Pune-04.

(Account No.), बँकेचे नाव (Bank Name) व IFSC Code इ. माहिती विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरताना अचूक व काळजीपूर्वक भरणे आवश्यक आहे.

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, सर्व विद्यार्थ्यांनी उपरोक्त अर्थसहाय्य योजनेअंतर्गत विहित नियम व अटी विचारात घेऊन माहिती वर उल्लेख केलेल्या वेळापत्रकानुसार विद्यापीठाच्या http://bcud.unipune.ac.in/Scholorships/Applicant/Login.aspx या लिंकवरून ऑनलाईन **(Online)** पध्दतीने अर्ज करावेत.

**ऑफलाईन** (Offline) **अर्जाचा अर्थसहाय्य योजनेसाठी विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.**

(डॉ. मुंजाजी वि. रासवे)
उपकुलसचिव

गणेशखिंड,पुणे–७ )
संदर्भ :शै.प्रवेश/ ३३७० )
दिनांक :१४/१२/२०२५ )

प्रत : माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव :

मा. विभागप्रमुख, सर्व विद्यापीठ विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
मा. प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्था.

आपणास विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक सर्व संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देऊन विहित मुदतीत कार्यवाही करण्यात यावी.

M.E.S. Night College of Arts & Commerce Pune-04.

17.12.25

**Principal**
M.E.S. Night College of Arts & Commerce
Karve Road, Pune-411 004.

## महत्वाच्या सूचना :

१. अर्थसहाय्य योजनेसाठी विहित केलेल्या तरतुदीनुसार नियम व अटींची पूर्तता करीत असलेल्या विद्यार्थ्यांनीच अर्ज करावेत.

२. विहित केलेल्या शैक्षणिक गुणांच्या टक्केवारीपेक्षा कमी गुण व A.T.K.T असलेल्या विद्यार्थ्यांनी अर्ज करू नयेत.

३. "क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले अर्थसहाय्य योजना" फक्त मुलींसाठी असून मुलांनी अर्ज करू नयेत.

४. "राजर्षी छत्रपती शाहू महाराज अर्थसहाय्य योजना" फक्त मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी असून खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी अर्ज करू नयेत.

५. "क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले अर्थसहाय्य योजना", "लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अर्थसहाय्य योजना", "राजर्षी छत्रपती शाहू महाराज अर्थसहाय्य योजना" व "महात्मा जोतीराव फुले अर्थसहाय्य योजना" या अर्थसहाय्य योजनेपैकी
   - पदवी अभ्यासक्रमासाठी फक्त एकाच वेळी अर्ज करता येईल.
   - पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी फक्त एकाच वेळी अर्ज करता येईल.
   - तसेच एकात्मिक स्वरूपाच्या अभ्यासक्रमांसाठी पहिल्या तीन वर्षात एकदा आणि नंतरच्या दोन वर्षात एकदा अर्थसहाय्य योजनेसाठी अर्ज करता येईल.

६. वरील अर्थसहाय्य योजनेचा फायदा विद्यार्थ्यास संपूर्ण पदवी काळात एकदाच आणि पदव्युत्तर काळात एकदा दिला जात असल्याने ज्या विद्यार्थ्यांनी सन २०२४–२५ मध्ये किंवा त्यापूर्वी या अर्थसहाय्य योजनेचा (शिष्यवृत्तीचा) लाभ घेतलेला असेल अशा विद्यार्थ्यांनी पुन्हा अर्ज करू नयेत.

७. विद्यार्थ्यांनी अर्ज भरताना त्यांना मिळालेल्या ग्रेड पॉईंट चा उल्लेख न करता गुणांच्या टक्केवारीचा उल्लेख करावा.

८. विद्यार्थ्यांनी **(Online)** माहिती भरताना अचूक व परिपूर्ण भरावी.

९. विद्यार्थ्याचे फक्त राष्ट्रीयकृत बँकेतच बचत खाते असावे.

१०. विद्यार्थ्यांनी बँकेची माहिती भरताना स्वत:चे नावे खाते असलेल्या राष्ट्रीयकृत बँकेची अद्ययावत माहिती अर्जामध्ये व्यवस्थितरित्या नमूद करावी. पालकांचे अथवा इतर व्यक्तींचे बँक खाते अर्थसहाय्य योजनेसाठी विचारात घेतले जाणार नाही.

११. ऑनलाईन **(Online)** अर्जासोबत विद्यार्थ्यांनी आवश्यक ती कागदपत्रे अर्जासोबत **Upload** करावीत इतर कोणतीही कागदपत्रे **Upload** करू नये.

१२. ऑनलाईन **(Online)** अर्जासोबत **Upload करावयाची आवश्यक कागदपत्रे**
   - विद्यार्थ्यांचे मागील लगतच्या अभ्यासक्रमाच्या गुणपत्रिकेची साक्षांकित प्रत.
   - वार्षिक उत्पन्नाचा तहसीलदाराने दिलेला दाखला.
     ("क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले अर्थसहाय्य योजना व "लोकशाहीर अण्णा भाऊ साठे आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी अर्थसहाय्य योजना" साठी आवश्यक )
   - दुष्काळग्रस्त, आपत्तीग्रस्त असल्याचा तहसीलदाराचा दाखला आवश्यक (स्वामी विवेकानंद विद्यार्थी सहाय्य योजनेसाठी)
   - जातीचा दाखला ("राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना" या शिष्यवृत्तीसाठी आवश्यक )
   - राष्ट्रीयकृत बँकेच्या बचत खातेच्या पासबुकची झेरॉक्स प्रत
   - छत्रपती शिवाजी महाराज अर्थसहाय्य योजनेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य / परिसंस्थेचे संचालक यांचा संबंधित महाविद्यालय / परिसंस्थेत शिकविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांपैकी सर्वात जास्त गुण प्राप्त केले (College/Institute Topper) असल्याचा दाखला जोडावा.

वरील सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करून ऑनलाईन **(Online)** पध्दतीने अर्ज करणे आवश्यक आहे. याची संबधित विभागाने / महाविद्यालयाने व विद्यार्थ्याने नोंद घ्यावी.

(डॉ. मुंजाजी वि. रासवे)
उपकुलसचिव

M.E.S. Night College of Arts & Commerce Pune-04.

**Principal**
M.E.S. Night College of Arts & Commerce
[illegible] Road, Pune-411 004.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे – ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune – 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## "क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले अर्थसहाय्य योजना"

(केवळ अस्वायत्त अव्यावसायिक महाविद्यालयातील मुलींकरीता)

शैक्षणिक गुणवत्ता असून देखील विद्यार्थिनी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून विद्यापीठाने महाविद्यालये/विद्यापीठ विभागामध्ये अव्यवसायिक अभ्यासक्रमास शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थिनींसाठी "क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले अर्थसहाय्य योजना" सुरू केलेली आहे.

सदर योजनेमध्ये पदवी (UG) साठी कमाल २००० विद्यार्थिनींना (मुली) व पदव्युत्तर (PG) साठी कमाल ५०० विद्यार्थिनींना (मुली) गुणवत्तेनुसार अर्थसहाय्य अस्वायत्त महाविद्यालयांच्या अव्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थिनींना (मुली) रू. ५,०००/– प्रत्येकी अर्थसहाय्य देण्यात येईल.

नियम व अटी :

१. सदर योजनेकरिता अस्वायत्त महाविद्यालये/विद्यापीठ शैक्षणिक विभागातील अव्यवसायिक पदवी अभ्यासक्रमास शिक्षण घेत असलेल्या जास्तीत जास्त २००० व अव्यवसायिक पदव्युत्तर अभ्यासक्रमातील जास्तीत जास्त ५०० विद्यार्थिनी गुणवत्तेनुसार सदर योजनेसाठी पात्र राहतील.
२. पात्र विद्यार्थिनीस रू. ५०००/– अर्थसहाय्य देण्यात येईल.
३. विद्यार्थिनींच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रू. २,५०,०००/– पेक्षा जास्त नसावे यासाठी संबंधित तहसिलदाराचा दाखला आवश्यक राहील.
४. सदरचे अर्थसहाय्य पात्र विद्यार्थिनीस संपूर्ण पदवी आणि पदव्युत्तर शैक्षणिक कालावधीत एकदाच देण्यात येईल.
५. विद्यार्थिनींने मागील लगतच्या परीक्षेत किमान ५० टक्के गुण संपादित केलेले असावेत. ५० टक्यांपेक्षा जास्त गुण असलेल्या विद्यार्थिनींचा गुणांनुक्रमे विचार करण्यात येईल.
६. अस्वायत्त महाविद्यालये/विद्यापीठ शैक्षणिक विभागामध्ये विद्यार्थिनीने नियमित अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असावा.
७. विद्यार्थिनीने व्यवसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेला नसावा.
८. विद्यार्थिनीची नियमित अभ्यासक्रमात किमान ७५ टक्के उपस्थिती असणे अनिवार्य राहील. या संदर्भात प्राचार्यांनी दाखला देणे आवश्यक राहील.
९. अर्थसहाय्य योजनेचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यास कोणतीही पगारी नोकरी स्विकारता येणार नाही.
१०. विद्यार्थिनीस गैरशिस्त/परीक्षेतील गैरप्रकार इ. बाबत शिक्षा झालेली नसावी.
११. अर्थसहाय्यासाठी विद्यार्थिनीच्या शैक्षणिक प्रगतीबरोबर इतर उपक्रमातील सहभाग उदा. क्रीडा, समाजसेवा, कला इ. विचारात घेण्यात येईल.
१२. विद्यार्थिनीने त्यांच्या स्वत:च्या नांवे असलेल्या बँक खात्याची संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे. उदा. बँकेचे नाव, पत्ता, खाते क्रमांक, एमआयसीआर कोड आणि आयएफएससी कोड.
१३. अर्थसहाय्य योजनेसाठी विद्यार्थिनींची निवड करण्यासाठी महाविद्यालय पातळीवर खालील प्रमाणे समिती गठीत करून अर्जाची छाननी करावी.
    १) मा. प्राचार्य/संचालक/मा. विभागप्रमुख (अध्यक्ष)
    २) समन्वयक, विद्यार्थी विकास योजना
    ३) तीन प्राध्यापिका (शक्यतो विविध विद्याशाखांच्या)

(डॉ. मुंजाजी वि. रासवे)
उपकुलसचिव

M.E.S. Night College of Arts & Commerce, Pune-04.

**Principal**
M.E.S. Night College of Arts & Commerce
Karve Road, Pune-411 004.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे - ४११००७
# Savitribai Phule Pune University
Ganeshkhind, Pune - 411007


## "लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अर्थसहाय्य योजना"

(केवळ अस्वायत्त अव्यावसायिक महाविद्यालयातील विद्यार्थी / विद्यार्थिनींसाठी)

आर्थिक दुर्बल घटकातील गुणवत्ताधारक गरजू विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने महाविद्यालये / विद्यापीठ विभागामध्ये अव्यावसायिक अभ्यासक्रमास शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी "लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अर्थसहाय्य योजना" सुरू केलेली आहे.

सदर योजनेमध्ये पदवी (UG) साठी कमाल २००० विद्यार्थ्यांना (मुले व मुली) व पदव्युत्तर (PG) साठी कमाल ५०० विद्यार्थ्यांना (मुले व मुली) गुणवत्तेनुसार अस्वायत्त महाविद्यालयांतील अव्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना रू. ५,०००/— प्रत्येकी अर्थसहाय्य देण्यात येईल.

नियम व अटी :

१. अस्वायत्त महाविद्यालये / विद्यापीठ शैक्षणिक विभागातील अव्यवसायिक पदवी अभ्यासक्रमास शिक्षण घेत असलेल्या जास्तीत जास्त २००० व अव्यवसायिक पदव्युत्तर अभ्यासक्रमास जास्तीत जास्त ५०० विद्यार्थी / विद्यार्थिनींना गुणवत्तेनुसार सदर योजनेसाठी पात्र राहतील.
२. पात्र विद्यार्थ्यास पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी रू. ५,०००/— गुणवत्तेनुसार आर्थिक सहाय्य देण्यात येईल.
३. विद्यार्थ्यांच्या पालकांचे (कुटूंबातील सर्व सदस्यांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न रू. २,५०,०००/— पेक्षा जास्त नसावे. यासाठी संबंधित तहसिलदाराचा दाखला आवश्यक राहील.
४. विद्यार्थ्याने मागील लगतच्या परीक्षेत किमान ६५ टक्के गुण संपादित केलेले असावेत.
५. अस्वायत्त महाविद्यालय / विद्यापीठ शैक्षणिक विभागामध्ये विद्यार्थ्याने नियमित अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असावा.
६. विद्यार्थ्यांची नियमित अभ्यासक्रमात किमान ७५ टक्के उपस्थिती असणे अनिवार्य राहील. यासंदर्भात प्राचार्यांनी दाखला देणे आवश्यक राहील.
७. विद्यार्थ्याने व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेला नसावा.
८. अर्थसहाय्य याजनेचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यास कोणतीही पगारी नोकरी स्विकारता येणार नाही.
९. विद्यार्थ्यास गैरशिस्त / परीक्षेतील गैरप्रकार इ. बाबत शिक्षा झालेली नसावी.
१०. विद्यार्थी भारतीय नागरिक असावा. त्यासाठी नागरिकत्वाचा साक्षांकित पुरावा जोडणे आवश्यक राहील. (रहिवासी दाखला)
११. विद्यार्थ्याने त्याच्या बॅंक खात्याची संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे. उदा. बॅंकेचे नाव, पत्ता, खाते क्रमांक, एमआयसीआर कोड आणि आयएफएससी कोड.
१२. संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य हे विद्यापीठाचे मान्यताप्राप्त किंवा प्रभारी प्राचार्य म्हणून मान्यताप्राप्त असावेत.
१३. सदरचे अर्थसहाय्य पात्र विद्यार्थ्यास संपूर्ण शैक्षणिक अभ्यासक्रमात एकदाच देण्यात येईल.

(डॉ. मुंजाजी वि. रासवे)
उपकुलसचिव

M.E.S. Night College of Arts & Commerce Pune-04.

**Principal**
M.E.S. Night College of Arts & Commerce
Karve Road, Pune-411 004.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे - ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune – 411007

## "राजर्षी छत्रपती शाहू महाराज अर्थसहाय्य योजना"

(केवळ अस्वायत्त अव्यावसायिक महाविद्यालयातील मागासवर्गीय विद्यार्थी/विद्यार्थिनींसाठी)

नियम व अटी :

१. सदरची योजना फक्त मागासवर्गीय विद्यार्थ्यांना लागू राहील.
२. सदरच्या योजनेसाठी उत्पन्नाची कोणतेही अट राहणार नाही केवळ गुणवत्ता हाच निकष राहील.
३. मागील लगतच्या परीक्षेत विद्यार्थ्यांनी किमान ६० टक्के गुण संपादित केलेले असावेत.
४. पात्र विद्यार्थ्यांचे वय पदवी अभ्यासक्रमाकरीता २५ व पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरीता ३० पेक्षा जास्त नसावे.
५. पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमातील योजनेस पात्र विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे अर्थसहाय्य योजना लागू राहील.

| | पदवी अभ्यासक्रम | | पदव्युत्तर अभ्यासक्रम | |
|---|---|---|---|---|
| | अर्थसहाय्य रक्कम (रूपये) | विद्यार्थी संख्या | अर्थसहाय्य रक्कम (रूपये) | विद्यार्थी संख्या |
| कला | ६००० | ६०० | ८००० | ३०० |
| वाणिज्य | ६००० | ६०० | ८००० | ३०० |
| विज्ञान | १०००० | ६०० | १६००० | ३०० |

६. सदर अर्थसहाय्य योजनेचा लाभ विहित केलेल्या विद्यार्थी संख्येनुसार देण्यात येणार असून त्यापैकी ३८ टक्के विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार (मागासवर्ग प्रवर्गातील सर्व विद्यार्थ्यांची एकत्रित गुणवत्ता विचारात घेऊन) व उर्वरित ६२ टक्के गुणवत्ताधारक मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्या त्या प्रवर्गासाठी शासनाने विहित केलेल्या आरक्षणाच्या टक्केवारीनुसार अर्थसहाय्य योजनेचा लाभ दिला जाईल.
७. विद्यार्थ्याने व्यवसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेला नसावा.
८. अस्वायत्त महाविद्यालय/विद्यापीठ शैक्षणिक विभागामध्ये विद्यार्थ्याने नियमित अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असावा.
९. विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यासक्रमात किमान ७५ टक्के उपस्थिती असणे अनिवार्य राहील यासंदर्भात प्राचार्यांनी दाखला देणे आवश्यक राहील.
१०. सर्व अव्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचा गुणवत्तेनुसार अर्थसहाय्य योजनेकरिता विचार केला जाईल.
११. विद्यार्थ्यास गैरशिस्त/परीक्षेतील गैरप्रकार इ. बाबत शिक्षा झालेली नसावी.
१२. विद्यार्थ्याने त्याच्या बँक खात्याची संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे. उदा. बँकेचे नाव, पत्ता, खाते क्र., एमआयसीआर कोड आणि आयएफएससी कोड.
१३. संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य हे विद्यापीठाचे मान्यताप्राप्त किंवा प्रभारी प्राचार्य म्हणून मान्यताप्राप्त असावेत.
१४. सदरचे अर्थसहाय्य पात्र विद्यार्थ्यास संपूर्ण शैक्षणिक अभ्यासक्रमात एकदाच देण्यात येईल.

(डॉ. मुंजाजी वि. रासवे)
उपकुलसचिव

M.E.S. Night College of Arts & Commerce Pune-04.

**Principal**
M.E.S. Night College of Arts & Commerce
Karve Road, Pune-411 004.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे - ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## "महात्मा जोतीराव फुले अर्थसहाय्य योजना"

(केवळ अस्वायत्त अव्यावसायिक महाविद्यालयातील विद्यार्थी / विद्यार्थिनींसाठी)

नियम व अटी :

१. सदर योजना अव्यवसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी लागू केलेली असून योजनेसाठी उत्पन्नाची कोणतेही अट राहणार नाही केवळ गुणवत्ता हाच निकष राहील.

२. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्याने मागील लगतच्या परीक्षेत किमान ७० टक्के गुण संपादित केलेले असावेत.

३. पात्र विद्यार्थ्याचे वय पदवी अभ्यासक्रमाकरिता २३ व पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता २५ पेक्षा जास्त नसावे.

४. पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमातील योजनेस पात्र विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे अर्थसहाय्य योजना लागू राहील.

| | पदवी अभ्यासक्रम | | पदव्युत्तर अभ्यासक्रम | |
|---|---|---|---|---|
| | अर्थसहाय्य रक्कम (रूपये) | विद्यार्थी संख्या | अर्थसहाय्य रक्कम (रूपये) | विद्यार्थी संख्या |
| कला | ६००० | ६०० | ८००० | ३०० |
| वाणिज्य | ६००० | ६०० | ८००० | ३०० |
| विज्ञान | १०००० | ६०० | १६००० | ३०० |

५. विद्यार्थ्यांची नियमित अभ्यासक्रमात किमान ७५ टक्के उपस्थिती असणे आवश्यक राहील. या संदर्भात प्राचार्यांनी दाखला देणे आवश्यक राहील.

६. अस्वायत्त महाविद्यालय / विद्यापीठ शैक्षणिक विभागामध्ये विद्यार्थ्याने नियमित अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असावा.

७. विद्यार्थ्याने व्यवसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेला नसावा.

८. विद्यार्थ्यास गैरशिस्त / परीक्षेतील गैरप्रकार इ. बाबत शिक्षा झालेली नसावी.

९. विद्यार्थ्याने त्याच्या बँक खात्याची संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे. उदा. बँकेचे नाव, पत्ता, खाते क्रमांक, एमआयसीआर कोड आणि आयएफएससी कोड.

१०. विद्यार्थी भारतीय नागरिक असावा. त्यासाठी नागरिकत्वाचा साक्षांकित पुरावा जोडणे आवश्यक राहील.

११. संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य हे विद्यापीठाचे मान्यताप्राप्त किंवा प्रभारी प्राचार्य म्हणून मान्यताप्राप्त असावेत.

(डॉ. मुंजाजी वि. रासवे)
उपकुलसचिव

M.E.S. Night College of Arts & Commerce Pune-04.

**Principal**
M.E.S. Night College of Arts & Commerce
Karve Road, Pune-411 004.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे – ४११००७

## Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune – 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ


### "स्वामी विवेकानंद विद्यार्थी सहाय्य योजना (पूरग्रस्त, दुष्काळग्रस्त व आपत्तीग्रस्त भागातील विद्यार्थ्यांसाठी)"

(व्यावसायिक व अव्यावसायिक स्वायत्त/अस्वायत्त महाविद्यालये/परिसंस्था व विद्यापीठ विभागातील विद्यार्थी/विद्यार्थिनींसाठी)

विद्यार्थ्यांना कोणत्या न कोणत्या कारणाने नैसर्गिक आपत्तीमुळे आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते. अशावेळी बरेच विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहतात. विद्यार्थ्यांना आर्थिक मदत होईल या उद्देशाने शैक्षणिक वर्ष २०२०–२१ पासून नव्याने सदर योजना सुरू केलेली आहे.

<u>नियम व अटी :</u>

१. सदर योजना व्यवसायिक व अव्यवसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार लागू राहील.

२. पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रत्येकी रू. २,०००/– प्रमाणे एकूण ११,००० विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य देण्यात येईल.

३. महाविद्यालये/विद्यापीठ शैक्षणिक विभागामध्ये विद्यार्थ्याने नियमित अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असावा.

४. विद्यार्थ्याची नियमित अभ्यासक्रमात किमान ७५ टक्के उपस्थिती असणे अनिवार्य राहील. या संदर्भात प्राचार्यांनी दाखला देणे आवश्यक राहील.

५. पुरग्रस्त, दुष्काळग्रस्त व आपत्तीग्रस्त भागातील विद्यार्थी म्हणून मा. प्राचार्य/विद्यापीठ विभागप्रमुख यांनी शिफारस करणे आवश्यक राहील.

६. अर्थसहाय्य याजनेचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यास कोणतीही पगारी नोकरी स्विकारता येणार नाही.

७. विद्यार्थ्यास गैरशिस्त/परीक्षेतील गैरप्रकार इ. बाबत शिक्षा झालेली नसावी.

८. विद्यार्थ्याने त्यांच्या बँक खात्याची संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे. उदा. बँकेचे नाव, पत्ता, खाते क्रमांकव एमआयसीआर कोड आणि आयएफएससी कोड.

९. विद्यार्थ्याने आणि संबंधित प्राचार्यांनी एकत्रित हमीपत्र भरून देणे आवश्यक राहील.

(डॉ. मुंजाजी वि. रासवे)
उपकुलसचिव

M.E.S. Night College of Arts & Commerce Pune-04.

**Principal**
M.E.S. Night College of Arts & Commerce
Karve Road, Pune-411 004.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे - ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune – 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## " छत्रपती शिवाजी महाराज अर्थसहाय्य योजना"

(व्यावसायिक व अव्यावसायिक स्वायत्त/अस्वायत्त महाविद्यालये/परिसंस्था व विद्यापीठ विभागांतील विद्यार्थी/विद्यार्थिनींसाठी)

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्यभिषेकाच्या ३५० व्या वर्षानिमित्त विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये/विद्यापीठ विभागातील पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक/अव्यावसायिक नियमित अभ्यासक्रमांस अंतिम वर्षाच्या शैक्षणिक वर्ष २०२४–२५ च्या उन्हाळी सत्राच्या संबंधित अभ्यासक्रमाच्या अंतिम परीक्षेत सर्व विद्याशाखामधून सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या (College/Institute/University Department Topper) प्रत्येक महाविद्यालय/परिसंस्था/विद्यापीठ विभाग प्रत्येकी फक्त एका विद्यार्थ्यास रू. ५०००/– अर्थसहाय्य देण्यात येईल.

नियम व अटी :

१. सदर योजना व्यावसायिक व अव्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या College/Institute Topper विद्यार्थ्यास लागू राहील.
२. पात्र विद्यार्थ्यास रू. ५,०००/– प्रमाणे आर्थिक सहाय्य देण्यात येईल.
३. महाविद्यालये/विद्यापीठ शैक्षणिक विभागामध्ये विद्यार्थ्यांने नियमित अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असावा.
४. विद्यार्थ्यांची नियमित अभ्यासक्रमात किमान ७५ टक्के उपस्थिती असणे अनिवार्य राहील. या संदर्भात प्राचार्यांनी दाखला देणे आवश्यक राहील.
५. सदर योजनेसाठी विद्यार्थी/विद्यार्थिनीची मा. प्राचार्य/संचालक/विद्यापीठ विभागप्रमुख/संचालक यांनी फक्त एका Topper विद्यार्थ्याची शिफारस करावी.
६. अर्थसहाय्य याजनेचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यास कोणतीही पगारी नोकरी स्विकारता येणार नाही.
७. विद्यार्थ्यास गैरशिस्त/परीक्षेतील गैरप्रकार इ. बाबत शिक्षा झालेली नसावी.
८. विद्यार्थ्याने त्यांच्या बँक खात्याची संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे. उदा. बँकेचे नाव, पत्ता, खाते क्रमांक, एमआयसीआर कोड आणि आयएफएससी कोड.
९. विद्यार्थ्याने आणि संबंधित प्राचार्यांनी एकत्रित हमीपत्र भरून देणे आवश्यक राहील.

(डॉ. मुंजाजी वि. रासवे)
उपकुलसचिव

College of Arts & Commerce, M.E.S. Night, Pune-04

**Principal**
M.E.S. Night College of Arts & Commerce
Karve Road, Pune-411 004.